बा. वि. म
८६१९

मुलांसाठी फुले

साने गुरुजी

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
144051

मुलांसाठी फुले

साने गुरुजी

इंद्रायणी साहित्य प्रकाशन

ISBN- 81-7418-080-x
Mulansathi Phule (Marathi)
Sane Guruji

- ***प्रकाशक***
  श्याम दयार्णव कोपर्डेकर
  इंद्रायणी साहित्य
  २७३, शनिवार पेठ,
  पुणे - ३०

- *© सर्व हक्क सुरक्षित*

- ***प्रकाशन दिनांक***
  २४ मार्च १९९७

- ***टाईपसेटिंग***
  संकल्प क्रिएशन्स
  २७३, शनिवार पेठ, पुणे - ३०

- ***मुद्रक***
  सुधीर जोशी
  चिंतामणी प्रिंटर्स
  ३२/१/५ एरंडवणे, पुणे ४

- ***मूल्य बारा रुपये***

अनुक्रमणिका

सत्त्वशील राजा / ३

मोरू / ७

आई व तिची मुले / १३

प्रामाणिक नोकर / १७

मधुराणी / २०

सत्त्वशील राजा

फार जुनी गोष्ट आहे. त्या वेळेस आपल्या देशात एक राजा होता. उदार म्हणून त्याची सर्वत्र ख्याती होती. तो राजा कोणाला कधीही नाही म्हणत नसे. कोणाचीही इच्छा अपूर्ण ठेवीत नसे. त्याच्या तोंडातून नकार कधीच बाहेर पडला नाही.

एके दिवशी राजा एकटाच गच्चीत बसला होता. आकाशात तारे चमकत होते. बागेतील रातराणीच्या वेलींचा वास येत होता. वारा हळूहळू वाहत होता. राजा विचार करीत होता. तो मनाशी म्हणाला, 'मी उदार म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु वास्तविक माझे असे मी काय देतो? प्रजेपासून मला पैसा मिळतो. त्या पैशांतूनच मी देणग्या देतो व उदार म्हणून मिरवतो. माझ्या स्वतःच्या मालकीचे मी काय दिले आहे? राजाच्या मालकीचे काय आहे? हे राजवाडे प्रजेच्या पैशातूनच बांधले. हे जडजवाहीर प्रजेच्या करातूनच विकत घेतले. ह्या माझ्या देहाशिवाय माझे असे काहीच नाही. माझी सारी मालमत्ता म्हणजे हा साडेतीन हातांचा देह. हा देह जर कुणी मागितला व मी दिला, तर मात्र मी खरा उदार ठरेन, खरा सत्त्वशील ठरेन.'

हे विचार करीत राजा झोपला. सकाळ झाली. राजाने स्नान केले. देवपूजा केली. नंतर तो याचकगृहाकडे निघाला. ज्याला ज्याला काही मागावयाचे असे, तो तो तेथे जाई. आज देवाच्या मनात राजाचे सत्त्व पाहण्याची इच्छा झाली. भगवान् शंकरांनी एका आंधळ्या अतिथीचे रूप घेतले व त्या अतिथीशाळेजवळ त्या याचकगृहाजवळ ते उभे राहिले.

राजा आला. जो जे जे मागत होता, ते ते राजा देत होता. आंधळ्याची पाळी आली. राजा त्याला म्हणाला, "आंधळ्या! तुला काय पाहिजे ते माग; असा मागे मागे काय राहतोस?" तो आंधळा

म्हणाला, "राजा! जे मागावयाचे आहे ते मागावयाला धीर होत नाही." राजा म्हणाला, "निर्भयपणे माग. येथे भिण्याचे काही कारण नाही." तो आंधळा म्हणाला, "मी आंधळा आहे. तुझ्या दोन डोळ्यांतील एक डोळा काढून मला देशील तर माझ्यावर उपकार होतील. देवाचे वैभव मी पाहू शकेन. तारे पाहीन, फुले पाहीन. तुझे मुखकमल पाहीन. समुद्र, सरिता, वृक्ष, पर्वत, सारे पाहीन. राजा, बोलत का नाहीस? नसेल देता येत तर नाही म्हण. तुझी कीर्ती ऐकली म्हणून मी आलो."

राजा बळेच म्हणाला, "आंधळ्या! अरे, घरदार माग, जमीन-जुमला माग. डोळा रे काढून कसा देऊ? जरा विचार करून तरी मागावे की नाही?" तो आंधळा म्हणाला, "म्हणूनच मी मागत नव्हतो. 'माग' म्हणालास म्हणून मागितले. प्रजेचे पैसे प्रजेला द्यायचे. गंगेतल्याच पाण्याने गंगेला अर्घ्य द्यायचे. राजा, तुझ्या उदारपणाची काय रे मोठीशी थोरवी? परंतु मी कशाला अधिक बोलू? बरे तर, मी जातो."

राजा म्हणाला, "आंधळ्या! थांब, थांब. मी डोळा देण्यास तयार आहे. कालच रात्री मी म्हणत होतो, जर माझा कोणी देह मागेल तर तो मला दिला पाहिजे. माझी इच्छा इतक्या लवकर पूर्ण होईल, असे मला वाटले नव्हते. परंतु देवाची कृपा. आज माझ्या एका डोळ्याचे तरी सार्थक होत आहे."

राजा डोळा काढून देणार, ही बातमी शहरात पसरली. राणी म्हणाली, "असा सुंदर डोळा का काढून देणार? वेडेपणा आहे. त्या आंधळ्याचे काय ऐकता?" प्रधान म्हणाले, "देण्याला तरी काही मर्यादा आहे. साऱ्या प्रजेचे तुम्ही पोशिंदे. तुम्ही सुखी तर प्रजा सुखी. असा वेडेपणा करू नये." राजा म्हणाला, "मी वेडा का तुम्ही वेडे? अरे, जरा विचार तरी करा. हे दोन डोळे आज सुंदर दिसत आहेत. आणखी पाचदहा वर्षांत त्यांची काय दशा होईल ते पहा. सारखे

पाणी गळेल, दिसत नाहीसे होईल, पू येऊ लागेल. अरे, हा सारा देह जावयाचा आहे. दहा वर्षांनी मी आंधळाच होईन किंवा सारा देहच मातीत जाईल. जाणाऱ्या नाशिवंत वस्तूला देऊन न जाणारी व चिरकाळ टिकणारी कीर्ती जर मोबदल्यात मिळत असेल, तर ती का न घ्या? हा डोळा देऊन मी अभंग, अमर असे यश जोडीत आहे. माझ्या कुळाचे नाव राहील, माझी गोष्ट लोक नेहमी सांगतील व ऐकतील. मी वेडा का तुम्ही वेडे?''

राजाचा निश्चय कायम राहिला. डोळे काढणाऱ्याला बोलावण्यात आले. वेलीवरचे फूल खुडावे, तळ्यातील सुंदर कमल तोडावे, तसा तो डोळा काढण्यात आला. राजाने हूं की चूं केले नाही. त्याच्या तोंडावर अपार आनंद व शांती विलसत होती. राजाच्या दुसऱ्या डोळ्यातून पाणी आले. राजा आंधळ्याला म्हणाला, ''माझा डोळा तुम्हाला चांगला बसला. जणू तुमच्यासाठीच तो होता. तुमच्या खाचेत नीट बसला. हा दुसराही घ्या. ह्या डोळ्याला वाईट वाटत आहे. दोन्ही डोळे दोघा भावांप्रमाणे एकत्र राहू देत.'' राजाने दुसरा डोळा काढविला. तो दुसरा डोळाही आंधळ्याच्या डोळ्याच्या जागी बसविण्यात आला. आंधळ्याला ते दोन्ही डोळे चांगलेच शोभू लागले.

राजा आंधळ्याला वंदन करता झाला. आंधळ्याने त्या राजाच्या डोक्यावर हात ठेवला व त्याच्या डोळ्यांवरूनही हात फिरवला. तो काय आश्चर्य? राजाला एकदम पुन्हा डोळे आले. पूर्वीच्या डोळ्यांहून सुंदर डोळे! राजा समोर बघतो तो प्रत्यक्ष भगवान् शंकराची मूर्ती! डोक्यावर गंगा आहे, कपाळावर चंद्र आहे, अंगावर साप आहेत; अशी ती शंकराची कर्पूरगौर मूर्ती पाहून राजाने त्याच्या पायांवर डोके ठेवले.

भगवान् शंकर म्हणाले, ''राजा, ऊठ. तुझी उदारता पाहून मी प्रसन्न झालो. नीट राज्य कर व अंती माझ्याकडे ये. तुला बाहेरचे

डोळे परत दिलेच; पण ह्या बाहेरच्या डोळ्यांहून मौल्यवान् असे जे अंतरीचे डोळे, जे ज्ञानचक्षू, ते तुला मी देतो म्हणजे तुझ्या हातून चूक होणार नाही, अन्याय होणार नाही. सर्वांपेक्षा राजाला या विचाराच्या डोळ्यांची, या ज्ञानदृष्टीची फारच जरुरी असते. कारण, कोट्यवधी लोकांचे हिताहित त्याच्या कृत्यांवर अवलंबून असते.''

भगवान् शंकर गुप्त झाले अंतर्धान पावले. राजाला नवे डोळे आले व ज्ञानदृष्टीही आली. तो सर्व प्रजेला प्रिय झाला. पुष्कळ वर्षे न्यायाने व सत्याने राज्य करून अंती तो कैलासवासी होऊन भगवान् शंकराजवळ राहिला! खरा थोर राजा!

✤ ✤ ✤

मोरू

मोरू म्हणून एक विद्यार्थी होता. आईबाबांपासून दूर एका शहरात तो विद्येसाठी राहत होता. त्याने एक खोली घेतली होती. तो फारसा श्रीमंत नव्हता, म्हणून तो हातानेच स्वयंपाक करी. त्याच्या खोलीत बिजलीची बत्ती नव्हती. साधा देशी कंदीलच होता. त्याच्या खोलीत तेलचूल (स्टोव्ह) नव्हती; साधी मातीचीच चूल होती. त्याच्या खोलीत फरशी नव्हती; साधी जमीनच होती.

मोरूची खोली लहानशीच होती. मोरू व्यवस्थित नव्हता. त्याला कामाचा अक्षयी कंटाळा. चूल कधी सारवायचा नाही. जमीन सारी उखळली होती. कंदिलाची काच काळी झाली होती. अंगातील कपडे मळले होते, निजावयाची सतरंजी, तिच्यात खंडीभर मळ साचला होता. तरी मोरू तसाच राहत होता. अगदीच ओंगळ व ऐदी.

एके दिवशी मोरू फिरायला गेला होता. एकटाच लांब फिरायला गेला. एका झाडाखाली एक मनुष्य बसला होता. मोरू त्याच्याकडे पाहू लागला. त्या माणसाच्या डोळ्यांतून पाणी येत होते. मोरूने त्याच्याजवळ जाऊन "तुम्ही का रडता?" असे विचारले. त्या मनुष्याला जास्तच हुंदका आला.

मोरू– तुम्ही असे मुलासारखे ओक्साबोक्शी का रडता?

मनुष्य– आजूबाजूचे रडणे ऐकून मलाही रडू आले.

मोरू– कोण रडत आहे? मला तर कोणाचे रडणे ऐकू येत नाही.

मनुष्य– तुझे कान तिखट नाहीत. तुम्ही सारे बहिरे झालेले आहात. तुमच्या कानात मळ भरला आहे.

मोरू– माझ्या कानात बिलकूल मळ नाही.

मनुष्य– दुसऱ्याची उपेक्षा करण्याचा मळ सर्वांच्या कानांत सारखाच भरून राहिला आहे. माझ्या आजूबाजूला मला सारखे रडणे ऐकू येत आहे.

मोरू– मला दाखवा, मला ऐकवा.

मनुष्य– हे झाड रडत आहे. ती पलीकडे चरणारी गाय रडत आहे.

मोरू– हे झाड काय म्हणते?

मनुष्य– 'सारे लोक माझी फुले व फळे तोडून नेतात. एक सुद्धा माझ्याजवळ ठेवीत नाहीत. सारे मला लुटतात. परंतु मला पाणी कोणी घालीत नाही. माझ्या मुलांना खाली अंधारातून पाण्यासाठी किती लांबवर धडपडत जावे लागते. परंतु माणसांना माझे कष्ट दिसत नाहीत. खुशाल येतात, दगडधोंडे मारतात. फुले तोडतात, फळे पाडतात, पाने ओरबाडतात,' असे म्हणून झाड सारखे रडत आहे.

मोरू– ती गाय का रडत आहे?

मनुष्य– तिला प्यायला पाणी नीट मिळत नाही, खायला पोटभर मिळत नाही. तिचा मुलगा गाडीला जोडतात. नांगराला जोडतात. व त्याच्या अंगात बोट बोट खोल आर भोसकतात! बिचारा बैल! त्याला नाही पोटभर दाणावैरण. तो किती ओढील? किती चालेल? मुलाचे हे हाल पाहून गाय रडत आहे. स्वतःच्या दुःखाचे तिला फारसे वाटत नाही, परंतु मुलाच्या दुःखाने ती वेडी झाली आहे. तिच्या डोळ्यांतील पाण्याचा भूमातेवर अभिषेक होत आहे.

मोरू– तुम्हाला ऐकू येते, तसे मलाही येऊ दे. मला ही शक्ती द्या.

मनुष्य– मनुष्य विचारी झाला, मनाने निर्मळ झाला की, त्याला

ही शक्ती येते. सर्व चराचराची भाषा त्याला समजू लागते, तारे आणि वारे, पशू आणि पक्षी, दगड आणि धोंडे, नद्या आणि नाले, झाड आणि माड साऱ्यांची सुख-दुःखे मग तो जाणतो. तुमच्या गावातील नदी तर सारखी रडते. तिचे पाणी ते तिच्या अखंड गळणाऱ्या आसवांचेच जणू आहे.

मोरू– ती काय म्हणते?

मनुष्य– लोक तिच्यात घाण करतात. जणू तिचं सत्त्वच पाहतात. तिच्यात शौच करतात. लघवी करतात! शेतातील शेंगा वगैरे आणून तिच्या पात्रात धुतात, सारे पाणी घाण करतात. तिला का बरे वाईट वाटणार नाही? परवा तहानलेली पाखरे चोच वासून आली; परंतु त्यांनाही ते पाणी पिववेना; तहानलेली वांसरे आली; परंतु पाणी हुंगून निघून गेली. माणसाला शिव्याशाप देत ती निघून गेली. सारी सृष्टी आज माणसाला शिव्याशाप देत आहे.

मोरू– तुमची शक्ती एक दिवस तरी मला द्या.

मनुष्य– बरे, तू आज गेलास की, ही शक्ती तुला येईल. काम करून, जेवण करून व अभ्यास करून अंथरुणावर पडलास की, तुला ही शक्ती येईल. आजच्या रात्रभरच फक्त ही शक्ती राहील. सकाळ होताच ती निघून जाईल.

मोरू– बरे, मी जातो.

त्या मनुष्याला नमस्कार करून मोरू लगबगीने घरी आला. केव्हा एकदा आपल्याला त्या शक्तीचा अनुभव येतो, असे त्याला झाले होते. खोलीत येऊन तो काळाकुट्ट कंदील त्याने लावला. त्या उखळलेल्या चुलीवर भात करून तो जेवावयास बसला. भराभर जेवण करून त्याने ती भांडी तशीच तेथे गोळा करून ठेवली. नंतर आपली पथारी पसरून तो तिच्यावर पडला. अजून ती शक्ती आली नव्हती. तो वाचीत पडला. त्याने दिवा बारीक केला. मोरूच्या चेहऱ्यात तो पहा फरक पडू लागला.

मोरूला हळूहळू ऐकू येऊ लागले. त्याने डोळे ताठ केले व तो पाहू लागला. मागे, पुढे, खाली, वर सर्वत्र त्याला आवाज ऐकू येऊ लागले. एकाएकी दीनवाणे शब्द त्याच्या कानावर आले. त्याच्या समोर कंदील होता. तो रडत होता. मोरूला ते रडणे ऐकू आले.

मोरू कंदिलाला म्हणाला, “का रे तू रडतोस?”

कंदील म्हणाला, “अरे तुझ्यासाठी मी काळा होतो. तू वाचावेस, ज्ञानाने तुझे तोंड उजळ व्हावे, म्हणून माझे तोंड काळे होते. परंतु तू मला कधी पुसतोस का? सकाळ होताच मला पुसून ठेव. पुन्हा रात्री तुझ्यासाठी तापेन; काळा होईन. सकाळी पुन्हा स्वच्छ कर. तू मला किती घाणेरडे केले आहेस बघ. मी रडू नको तर काय करू?”

इतक्यात मोरूला अगदी जवळच रडणे ऐकू आले. जणू त्याच्या अंगातून ते निघत होते. त्याच्या अंगातील सदरा व नेसूचे धोतर; तीही रडत होती.

मोरू म्हणाला, “अरे, माझ्या सदऱ्या, का रे रडतोस?”

सदरा म्हणाला, “तुझा घाम लागून मी घामट झालो, तुझ्या अंगाचे रक्षण करून मी मळलो. धूळ व धूर मी अंगावर घेतो. परंतु तू मला कधी धूत नाहीस. मला स्वच्छ करीत नाहीस. पूर्वी पाण्यात पडताच मी ओला होत असे, आता पाणी माझ्यात शिरत नाही, ते सुद्धा जवळ येण्यास लाजते, इतका मी गलिच्छ झालो आहे. आणि हे सारे तुझ्यासाठी. मी रडू नको तर काय करू?”

धोतर म्हणाले, “त्या दिवशी तू उडी मारीत होतास, त्या वेळेस तुझ्या अंगात काटे बोचू नयेत म्हणून मी पुढे झालो व माझे अंग फाडून घेतले. परंतु मला चार टाके घातलेस का? तसेच ते शाईचे डाग माझ्या अंगावरचे धुतलेस का?”

सतरंजी व घोंगडी, त्याही बोलू लागल्या. “अरे, आमच्यात तुझ्या पायांची धूळ किती रे भरलीस? तुझे ते घाणेरडे पाय ते आमच्यावर ठेवतोस. आम्हांला जरा झटकून तरी टाकीत जा.”

खालची जमीन म्हणाली, "अरे, माझे सारे अंग सोलून निघाले. तू माझ्यावर बसतोस, उठतोस, नाचतोस, कुदतोस. मला शेणामातीने कधी सारवतोस का? ते मलम अंगाला मधून मधून लावीत जा रे. सारे अंग ठणकते आहे. काय तुला सांगू? किती वेदना, किती हाल?"

चूल म्हणाली, "तुझ्यासाठी मी तापते. भाताचा कड जाऊन माझे अंग पहा कसे झाले आहे? अरे, रोज सकाळी मला सारवीत जा. माझ्यावरून हात फिरव. अशी दीनवाणी नका रे मला ठेवू!"

ती खरकटी भांडी म्हणाली, "मोरू, तू जेवलास, परंतु आम्हाला सकाळपर्यंत अशीच खरकटलेली ठेवणार ना? चिखलात बरबटलेले बसून राहायला तुला आवडेल का रे? ही तुझी आमटी, हे ताक, हे शितकण– सारे तसेच आमच्या अंगावर. आम्हाला रात्री कधी झोप येत नाही. आम्हांला घासूनपुसून ठेवीत जा. तुझ्यासाठी चुलीवर

आम्ही काळी होतो. तुझ्या जेवणामुळे आम्ही ओशट होतो. कृतज्ञता नाही का रे तुला?''

पिशवीतील पुस्तक म्हणाले, ''अरे, तुला मी ज्ञान देतो. पशूचा मनुष्य करतो. परंतु माझी दशा बघ काय केली आहेस ती! पानन् पान सुटले आहे. शाईचे डाग पडले आहेत. तुला नाही का रे दयामाया?''

मोरूला खोलीतील प्रत्येक वस्तू काहीतरी गाऱ्हाणे करीत आहे असे दिसले. साऱ्यांचा त्याच्यावर आरोप. 'तू कृतघ्न आहेस. तुझ्यासाठी आम्ही झिजतो, श्रमतो, काळे होतो. तू आमच्यासाठी काय करतोस?' असे सारी म्हणत होती.

एकाएकी सारे आवाज बंद झाले. मोरू अंथरुणावर गंभीरपणे बसला. शेवटी खोलीतील सर्व वस्तूंना त्याने रडत रडत गहिवरून साष्टांग नमस्कार घातला व हात जोडून तो म्हणाला, ''माझ्या उपकारकर्त्यांनो, आजपासून तुमची काळजी घेईन, तुम्हाला स्वच्छ राखीन. तुम्ही क्षमावान आहात. या मुलाला चुकल्यामाकल्याची, झाल्यागेल्याची क्षमा करा. आजपासून मी कृतज्ञता दाखवीन. सर्वांचे उपकार स्मरेन. रडू नका, रुसू नका, या मुलावर प्रसन्न व्हा.''

दुसऱ्या दिवसापासून मोरू अगदी निराळा मुलगा झाला. सर्वांना त्याच्यातील फरक पाहून आश्चर्य वाटले. ते म्हणत, ''मोरू, अलीकडे सूर्य पश्चिमेस उगवू लागला?'' मोरू म्हणे, ''तुम्हांला काय माहीत आहे? मी केवढा थोर अनुभव घेतला तो?'' ते विचारीत, ''कोणता?'' मग मोरू ही सारी हकीगत सांगे व ती ऐकून त्याचे मित्रही गंभीर होऊन घरी जात व नीट वागत.

मोरू व त्याचे मित्र वागू लागले, तसे आपणही सारे वागू या.

✤ ✤ ✤

आई व तिची मुले

ती एक गरीब विधवा होती. मोलाने काम करी व चार कच्च्या-बच्च्यांचे पालनपोषण करी. एका लहानशा झोपडीत ती राहत असे. ती सदैव समाधानी असे. सकाळपासून सायंकाळपर्यंत एका क्षणाचाही विसावा तिला मिळत नसे.

त्या दिवशी कोणता तरी सण आला होता. घरोघर आनंद होता. प्रत्येकाच्या घरी आज कोणते ना कोणते तरी पक्वान्न करण्यात येत होते. रामाच्या घरी त्याच्या बापाने श्रीखंडासाठी चक्का आणला होता. मधुकरला बासुंदी आवडे म्हणून त्याच्या आईने कढईत दूध आटत ठेवले होते. गोविंदाच्या घरी पुरणपोळी होती. परंतु आमच्या त्या गरीब मोलकरणीच्या झोपडीत काय करण्यात येणार होते?

त्या मोलकरणीने मोठ्या मिनतवारीने दोन पैसे शिल्लक ठेवले होते. ती आज पुरणपोळी करणार होती. तिने एका परळात कणीक ठेवली होती. परंतु बाजारातून गूळ आणावयाचा होता. दुकानदार लहान मुलांना फसवतात, म्हणून ती गूळ आणण्यासाठी जाण्यास निघाली. ती आपल्या मुलांना म्हणाली, "येथे ही परळात कणीक आहे. मी ह्या घडवंचीवर ती ठेवून जाते. तुम्ही घरातच असा हो! दार उघडे टाकून बाहेर नका जाऊ; कोंबडा-कुत्री घरात शिरतील. मी लौकरच येते गूळ घेऊन. आज तुम्हाला गोड हवं ना. आज तुम्हाला पुरणाची पोळी करणार आहे."

"पुरणाची पोळी? ओहो मजाच!" असे ती मुले आनंदाने टाळ्या वाजवून म्हणाली. त्यांची आई बाहेर गेली. मुले घरात बसली होती. इतक्यात त्यांच्या बोळातील मुले बाहेर आली व ती त्यांना हाका मारू लागली.

"अरे, आज सणाचा दिवस. असे घरात रे काय बसता चूलकोंबड्यासारखे? चला बाहेर खेळायला." बाहेरची मुले हिणवू लागली. आग्रह करू लागली. शेवटी घरातील मुले बाहेर आली. आईने सांगितलेले ती विसरून गेली. मुलेच ती. खेळापुढे त्यांना कसली आठवण नि कसले काय! इतर मुलांबरोबर ती खेळावयास निघून गेली. झोपडीचे दार नीट लावून घेण्यास ती विसरली.

ती पहा एक कोंबडी. कशी दिसते पोक्त व प्रेमळ. ती पहा तिची पिले तिच्याभोवती नाचत आहेत. आज सणावाराचा दिवस, आपल्या पिलांना काय द्यावे, याची जणू तिला चिंता होती. रोज उकिरडे



उकरून ती पिलांना खायला देत असे. परंतु आजच्या दिवशी नकोत ते उकिरडे व तेथील ते किडे, असे तिला वाटले. ती पिलांना घेऊन हिंडत त्या गरीब बाईच्या झोपडीजवळ आली, दार उघडेच होते. जणू तिचे स्वागत करण्यासाठीच ते उघडलेले होते. कोंबडी पिले घेऊन आत गेली. कोंबडी शोध करू लागली. तेथे घडवंचीवर तिला परळ दिसला. तिने घडवंचीवर उडी मारली. आपल्या चोचीने ती कणीक तिने खाली फेकण्यास सुरुवात केली. पिले मटामट खाऊ लागली. कोंबडीसुद्धा फराळ करू लागली. परळातील सारी कणीक तिने पिस्कारून टाकली. मायलेकरे स्वस्थपणे सणावाराचे जेवण जेवत होती.

ती गरीब आई बाजारातून गूळ घेऊन झोपडीत शिरली. ती कोंबडी एकदम घाबरली. 'पक् पक्' करू लागली. तिच्या त्या उडण्याच्या धांदलीत तो परळ पडला व फुटला. होती नव्हती कणीक सारी उपडी झाली. ती केरात मिसळली. कोंबडी व तिची पिले पसार झाली. ती गरीब माता खिन्नपणे तेथे उभी राहिली.

तिला मुलांचा राग आला. कोंबडीच्या पिलांनी तेथे सारी घाण केली होती. ती कणीक घेण्यासारखी नव्हती. बाजूची थोडी थोडी तिने गोळा केली. परंतु ती कितीशी पुरणार? माता कणीक गोळा करीत आहे तो मुले धावतच घरी आली. तेथील तो प्रकार पाहून ती अगदी ओशाळली.

"काय आता खाल? आज म्हटलं पुरणपोळी करीन; परंतु नाही तुमच्या नशिबी. तरी सांगितले होते की, घरातून जाऊ नका म्हणून. क्षणभर तुमचा पाय घरात टिकत नाही. सतवायला व छळायला आली आहेत कार्टी जन्माला! जरा म्हणून ऐकत नाहीत." ती माता मुलांना रागे भरू लागली.

ती मुले रडू लागली. त्यांचा आनंद पार मावळला. त्यांचा आधार म्हणजे आई. ती आईच रागे भरू लागली; आता कोणाकडे

त्यांनी जावे? कोणाकडे बघावे? ती मुसमुसत तेथे अपराध्याप्रमाणे उभी राहिली. आईचे गोड शब्द ऐकण्यासाठी ती भुकेलेली होती. पोटातील दुसरी भूक निघून गेली. परंतु आईच्या प्रेमाची भूक फार लागली होती.

शेवटी त्या आईला मुलांचा कळवळा आला. सणावारी आपली मुले रडावीत असे कोणत्या आईला वाटेल? तिने त्या साऱ्यांना जवळ घेतले. त्यांचे ओले डोळे स्वत:च्या पदराने पुसले. सर्वांच्या तोंडावरून, डोक्यावरून, पाठीवरून तिने प्रेमळ हात फिरवला. ती म्हणाली, "उगी, रडू नका हो. कोंबडीच्या पिलांचा सण झाला. त्यांना नको का चांगले खायला? तुमची आई तुम्हांला गोड देणार, कोंबडी तिच्या पिलांना देणार. घरात थोडे बाजरीचे पीठ आहे. त्यांत ही थोडीशी कणीक आहे ती पण मिसळीन. गूळ घालून त्याचे गाकर करीन. तेलाशी खा कुसकरून. चांगले लागतात. आज सणाचा वासर । करू आपण गाकर ।।" असे तिने गाणेच केले.

एका क्षणात मुलांचे दु:ख गेले. ती हसू-खेळू लागली. आईने केलेली कविता त्यांनी आणखी वाढविली.

आज सणाचा वासर। करू आपण गाकर।।
रोजची आहे भाकर। खाऊ आज गाकर।।
खाती कोंबडीची पिले। खातील आईची मुले।।
करू कोंड्याचा मांडा। चला खेळ गोड मांडा।।

आईचे प्रेम पाहून मुले जणू कवीच झाली. चुलीजवळ त्यांची आई गाकर करीत होती. तिच्या अवतीभोवती मुले नाचत होती. तिने त्यांची पाने मांडली. कढत कढत गाकर त्यांना तिने वाढले. मुले आनंदाने खाऊ लागली. मुलांचा आनंद पाहून त्या मातेचे हृदय भरून आले.

✤ ✤ ✤

प्रामाणिक नोकर

एका कापडाच्या व्यापाऱ्याने आपल्या दुकानात एक नवीन मुलगा नोकरीस ठेवला. त्या मुलाचा बाप गरीब होता. बापाने मुलाला शाळेतील शिक्षण दिले नव्हते. परंतु घरगुती शिक्षण त्याने दिले होते. प्रामाणिकपणाने वागावे, कोणाला फसवू नये. कोणाला हसू नये. कष्टाने मिळेल ते खावे. चोरी-चहाडी करून श्रीमंत होण्यापेक्षा खरेपणाने वागून गरिबीत राहवे लागले तरी आनंदाने राहवे, असे त्याचा बाप त्याला शिकवीत असे. निरनिराळ्या बोधपर गोष्टी सांगून मुलाला चांगले वळण त्याने लावलेले होते.

मुलगा चुणचुणीत होता; चपळ होता; परंतु त्याहीपेक्षा खरेपणाने वागणारा, गोड बोलणारा व प्रामाणिक होता. दुकानात तो सर्वांना आवडे. गिऱ्हाईक त्याच्याकडे जास्त यावयाचे; दुसऱ्या नोकराकडे कमी जावयाचे. बोलायला गोड, दिसायला गोड, मनाने गोड, हृदयाने गोड, अशी मुले म्हणजे देवाघरची फुले.

एके दिवशी एक श्रीमंत बाई काही रेशमी कापड खरेदी करावयास आली होती. एक रेशमी साडी तिने पसंत केली. तिला पोत आवडले, रंग आवडला. पदरही सुंदर होता. तो मुलगा ती साडी बांधून देत होता परंतु इतक्यात ती साडी एके ठिकाणी थोडी फाटली आहे असे त्याला दिसले. त्या बाईने ते पाहिले नव्हते. परंतु तो मुलगा प्रामाणिक होता. तो तिला गोड शब्दांत म्हणाला, "बाई, ही साडी येथे जरा फाटली आहे. ही नका घेऊ. दुसरी पसंत करा; येथे पुष्कळ नग आहेत."

परंतु त्या बाईला तसलीच साडी पाहिजे होती. तशी दुसरी साडी त्या दुकानात नव्हती. ती बाई निघून गेली. दुकानदार गादीवर

बसलेला होता. नोकराचे ते वर्तन पाहून त्याला राग आला. असला नोकर काय कामाचा? त्याच्यामुळे दिवाळे काढण्याची पाळी यावयाची, असे तो मनात म्हणाला.

'तुमचा मुलगा दुकानात काम करावयास योग्य नाही. तो माझ्या मर्जीतून अजिबात उतरला आहे. असे नोकर ठेवून धन्याला लौकरच हाय हाय म्हणत बसण्याची पाळी येईल. मी तुमच्या मुलास काढून टाकू इच्छित आहे.' अशी एक चिठ्ठी लिहून त्या मुलाबरोबरच त्याच्या बापाकडे त्याने पाठविली.

बापाने चिठ्ठी वाचली. बापाने मुलाला, काय झाले म्हणून विचारले. मुलगा म्हणाला, "माझ्या हातून काही चूक घडल्याचे मला तरी माहीत नाही. त्यांनाच जाऊन विचारा म्हणजे उलगडा होईल."

मुलगा व बाप दोघे दुकानात आले. बाप त्या शेठजीजवळ जाऊन चौकशी करू लागला. तो शेठजी रागारागाने म्हणाले, "अहो, ती बाई साडी चांगली घेत होती. ती साडी बांधून देणे एवढे याचे

काम. दुकानातील मालावर टीका करीत बसण्याची काही जरुरी होती? ती साडी कोठे जरा फाटकी होती. त्या बाईचे लक्षही नव्हते. याला ते दिसले व आपण होऊन हा त्या बाईला म्हणतो, 'बाई, ही घेऊ नका साडी. ही जरा फाटली आहे.' आहे की नाही अक्कल! अशाने का दुकान चालेल? पंचवीस रुपायांचा माल पडला अंगावर?''

"ह्याचा आणखी काही अपराध आहे का?'' बापाने विचारले.

"नाही, तसा तो फार चांगला आहे, गोड बोलतो, गोड वागतो. परंतु नुसत्या गोडपणाला काय चाटायचे आहे? व्यवहार आधी. व्यवहारासाठी गोडपणा; व्यवहारासाठी तिखटपणा; व्यवहारासाठी खरे; व्यवहारासाठी खोटे. व्यवहार चालला पाहिजे.'' तो शेठजी म्हणाला.

"माझ्या मुलाचा एवढाच अपराध असेल तर मीच त्याला तुमच्या दुकानात ठेवू इच्छित नाही. तुमचेही नुकसान नको व्हायला व त्याच्याही जन्माचे नुकसान नको व्हायला. चल रे बाळ, येथे तू राहू नकोस!'' असे म्हणून बाप आपल्या मुलाला घेऊन गेला.

त्या मुलाची ही कीर्ती सर्वत्र पसरली व एका नामांकित दुकानातून त्याला मुद्दाम मागणी आली. त्या दुकानात तो रुजू झाला. तो मुलगा त्या दुकानात कामावर राहताच त्या दुकानाची विक्री दसपट वाढली. त्या नव्या मालकाने त्या मुलाला पुढे आपल्या दुकानात भागीदारी दिली व तो मुलगा सुखी झाला.

तो मुलगा आपल्या वृद्ध आईबापांना प्रेमाने म्हणतो, "तुम्ही मला प्रामाणिक केलेत त्याचे हे फळ. आणि हे फळ न मिळता आपण गरिबीत राहिलो असतो. तरीही मी सुखाने राहिलो असतो. कारण मनाचे समाधान ही सर्वांत मोठी संपत्ती होय. ज्याचे मन खाते, तो कितीही श्रीमंत असला तरी दुःखी व दरिद्रीच असणार! आई, खरे आहे ना म्हणतो मी ते?''

मधुराणी

एका राजाचे दोन मोठे मुलगे आपआपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी राजधानी सोडून दूर जगात मुशाफिरीला गेले. वाटेत ते नाना प्रकारच्या फंदात सापडले. वेडेवाकडे वागू लागले. घरी येण्याचे भान त्यांना राहिले नाही. त्यांचा तिसरा एक भाऊ घरी होता. तो अगदी बुटबैंगण होता. हा बटुवामन आपल्या दोघा भावांचा शोध करण्यासाठी बाहेर पडला. हिंडता हिंडता त्याची व त्या दोघा भावांची गाठ पडली. त्याला पाहून ते पोट धरधरून हसू लागले. ते थट्टेने म्हणाले, "अरे वेड्या, तू कशाला जगाच्या यात्रेला निघालास? तुझं पाऊल मुंगीचं. आमची दहा पावले व तुझी शंभर बरोबर." तरीपण त्यांच्याबरोबर तोही निघाला. तिघे प्रवास करू लागले.

ते हिंडता हिंडता एका मुंग्यांच्या वारुळाजवळ आले. त्या दोघा मोठ्या भावांना ते वारूळ पाहून जमीनदोस्त करण्याची इच्छा होती. मुंग्यांची कशी त्रेधा व तिरपीट उडेल, आपली अंडी तोंडात घेऊन त्या कशा सैरावैरा धावपळ करू लागतील, याची गंमत त्या आडदांड बंधूंना पाहण्याची इच्छा होती. परंतु तो धाकटा बुटका भाऊ म्हणाला, "नका रे पाडू, किती कष्टाने व मेहनतीने ते उभारलेले आहे! पाडणे सोपे, पण उभारणे कठीण जाते. आपला होईल खेळ, परंतु मुंग्यांचे होईल मरण. गरीब, उद्योगी मुंग्या, राहू द्या त्यांना सुखाने. नका त्यांच्या वाटेस जाऊ! त्यांनी काय तुमचे केले?"

त्या दोघा भावांचे त्याने मन वळविले. ते तिघे पुढे चालू लागले. वाटेत एक सुंदर सरोवर होते. त्या सरोवरात दोन बदके

खेळत होती. आनंदाने आवाज काढीत होती. त्या दोघा भावांच्या मनात आले की, त्या बदकांना पकडावे, भाजून, परतून खाऊन टाकावे. परंतु बटूवामन म्हणाला, "नका रे त्यांना पकडू. कसे नावेसारखे डोलत आहेत. त्यांना सुखाने नांदू द्या, पाण्यात खेळू द्या, डुंबू द्या. त्यांनी रे तुमचे काय केले?"

त्या भावांनी ऐकले व ते तिघे पुढे गेले. एका झाडावर मधाचे पोळे होते. त्यात इतका मध साठला होता की, मधाच्या धारा खाली गळू लागल्या होत्या. ते दोघे भाऊ म्हणाले, "या, आपण त्या मधमाश्या जाळू व पोळे काढून मध पिऊ." तो धाकटा भाऊ म्हणाला, "नका रे नका. हजारो फुलांजवळ जाऊन, गोड गोड बोलून त्या थेंब थेंब मध जमवितात. अशा उद्योगी मधमाश्यांना का जाळावे? आपणास हे शोभत नाही. राहू द्या त्यांना सुखाने, जमवू द्या मध आनंदाने."

त्या दोघा भावांनी ते मानले व ते पुढे गेले. जाता जाता ते एका किल्ल्याजवळ आले. त्या किल्ल्यात ते शिरले. तेथे घोड्यांचे तबेले होते. परंतु त्या तबेल्यांतील सारे घोडे आरसपानी दगडांचे होते! तेथे आजूबाजूस कोणी माणूस दिसेना. तेथील सर्व खोल्या व दिवाणखाने ते शोधू लागले. शेवटी एका दरवाजाजवळ ते आले. त्या दरवाजाला तीन कुलपे होती. त्या दाराला फटी होत्या, त्या फटीतून आतील सारे दिसत होते. त्यात एक म्हातारा मनुष्य टेबलाजवळ बसलेला होता. त्या भावांनी त्याला एक-दोन हाका मारल्या, परंतु म्हाताऱ्याने ऐकले नाही किंवा मुद्दाम लक्ष दिले नाही. त्यांनी पुन्हा एकदा एक मोठ्याने हाक मारली. म्हातारा उठला व बाहेर आला.

तो काही एक बोलला नाही. सारे मुक्याने चालले होते. त्याने त्यांचे हात धरून त्यांना एका टेबलाजवळ नेले. त्या टेबलावर नाना खाद्यपेये होती. त्या सर्वांचा यथेच्छ समाचार त्या भुकेलेल्या तिघांनी

घेतला. त्या म्हाताऱ्याने त्यांना एका शेजघरात नेले. तेथे ते तिघे भाऊ रात्री गाढ झोपी गेले.

सकाळ झाली. त्या तिघांतील जो सर्वांत वडील भाऊ होता, त्याच्याजवळ तो म्हातारा गेला. म्हाताऱ्याने त्याचा हात धरून त्याला एक टेबलाजवळ नेले. त्या टेबलाजवळ तीन फळ्या होत्या. त्या तिन्ही तुकड्यांवर काही लिहिलेले होते. त्या किल्ल्यावरची घातलेली जादू कशाने दूर होईल, हे त्या तीन लेखांत लिहिलेले होते, तेथे जी पहिली फळी होती तिच्यावर पुढील मजकूर होता—

'रानातील दलदलीखाली राजाच्या मुलीची हजार मोती आहेत. सूर्यास्तापर्यंत ती सारी शोधून काढली पाहिजेत. एकही जरी कमी भरले तरी शोधणारा संगमरवरी दगड होऊन बसेल!'

सर्वांत मोठा भाऊ रानात गेला व मोत्यांचा शोध करू लागला. दिवस मावळण्याची वेळ होत आली, पाखरे घरट्यात जाऊ लागली. परंतु हजार तर दूरच राहिली, शंभर सुद्धा मोती त्याला मिळाली नव्हती. सूर्य सर्व खाली गेला व तो भाऊही दगड होऊन पडला!

दुसऱ्या दिवशी मधला भाऊ त्या कामगिरीवर निघाला. परंतु भावाची गत तीच जी त्याचीही झाली. मोठ्या भावाने शंभर मोती जेमतेम गोळा केली होती; त्यात आणखी शंभराची मोठ्या मिनतवारीने या भावाने भर घातली. परंतु अट पुरी झाली नाही. दिवस मावळला, गाई गोठ्यात गेल्या, पाखरे घरट्यात गेली. बाहेर अंधार पडला व हा मधला भाऊही दगड होऊन पडला!

शेवटी त्या बुटक्याची पाळी आली. त्या दलदलीजवळ येऊन तो शोधू लागला, पाहू लागला. तो आधीच लहान व अशक्त. मोती शोधून काढणे मोठे दगदगीचे व कंटाळवाणे काम होते. शेवटी वैतागून तो बसला एका दगडावर व रडू लागला. त्याने ज्या मुंग्यांचे वारूळ वाचविले होते, त्या मुंग्याच्या राजाला ही गोष्ट कळली. पाच

हजार कामकरी मुंग्या घेऊन तो जातीनिशी तेथे मदतीस धावून आला. लौकरच मोत्यांची रास त्यांनी तेथे तयार केली!

परंतु तेथे दुसरी फळी होती, तिच्यावर पुढीलप्रमाणे लिहिलेले होते–

‘राजकन्येच्या शयनमंदिराची किल्ली सरोवरात आहे ती काढून आणली पाहिजे.’

तो बटूवामन सरोवराच्या काठी आला. ते खोल सरोवर, किती लांब व रुंद. ती कशी सापडणार? परंतु ती दोन कृतज्ञ बदके



त्याच्याजवळ आली व म्हणाली, "तू आम्हाला वाचविलेस. आम्ही तुला वाचवू. चिंता करू नकोस." ती बदके गेली पाण्यात. बुड्या मारून त्यांनी किल्ली शोधून काढली. ती त्यांनी त्या राजपुत्राजवळ आणून दिली.

परंतु अजून तिसरी फळी होती. तिच्यावरची अट फारच कठीण होती. तिच्यावर पुढील मजकूर होता–

राजाच्या तीन मुली सारख्याच सुंदर दिसत होत्या.

त्यांच्याच कोणताच फरक दिसत नव्हता. अगदी हुबेहूब एकमेकांची जणू बिंबप्रतिबिंब. त्या राजपुत्राला एक गोष्ट मात्र सांगण्यात आली होती. ती गोष्ट म्हणजे 'सर्वांत वडील मुलीने साखरेचा तुकडा खाल्ला आहे, मधलीने गोड सरबत घेतले आहे व धाकटीने चमचाभर मध घेतला आहे.' ही होय. आता मध घेणारी कोणती, हे ओळखून काढावयाचे होते.

ती मधमाश्यांची राणी आली. ज्या मधमाश्यांना त्याने जाळू दिले नाही, त्यांची राणी त्याच्यासाठी धावून आली. ती मधमाशी त्या तिघी मुलींच्या तोंडाचा वास घेऊ लागली व शेवटी जिने मध घेतला होता तिच्या ओठावर ती बसली! धाकट्या भावाने धाकटी मुलगी शोधून काढली.

तिन्ही अटी पुऱ्या झाल्या. जादू निघून गेली. जे दगड होऊन पडले होते ते सारे पूर्वीप्रमाणे होऊन उभे राहिले, त्या बुटबैंगणाचा त्या सर्वांत लहान असलेल्या मुलीशी विवाह झाला. त्या दुसऱ्या दोन राजकन्या त्याच्या दुसऱ्या भावांना देण्यात आल्या. त्या मुलींचा बाप मेल्यावर तो बिटुकला राजा झाला. सारे सुखी झाले.

✤ ✤✤

मुलांवर साने गुरुजींची अपरंपार माया. मुलांमध्ये ते फुलत-खुलत. आपल्याजवळ जे जे काही सर्वोत्कृष्ट ते ते या मुलांसाठीच, अशी त्यांची भावना असे. त्यांचे समवयस्क, त्यांचा स्नेह लाभावा म्हणून झुरत, पण गुरुजींच्या मनाच्या पाकळ्या उमलवण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नसे. 'मुले म्हणजे देव, मुले म्हणजे राष्ट्राची मोलाची ठेव' असे साने गुरुजींना वाटे. प्रभूशी आपला संबंध जोडणारा हा एक दुवा आहे, अशी त्यांची भावना होती. मुलांची बुद्धी प्रखर आणि मने कोवळी असावी यासाठी ते लिहीत. मुले हा त्यांच्या साहित्याचा वाचकवर्ग. त्या मुलांना समोर कल्पूनच ते सारे लिहीत, बोलत. वात्सल्यात ओला होऊन प्रत्येक शब्द त्यांच्या लेखणीतून उमटे. ते म्हणत,

'करी मनोरंजन जो मुलांचे,
जडेल नाते प्रभुशी तयाचे.'

- यदुनाथ थत्ते